# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

क्र:मविनिआ/माअअ/84/2018/ ३२१ दि.22.11.2018

प्रति,
श्री. सुरेश कृष्णराव पाटील,
शॉप नं. ८, ग्रीट शॉपिंग सेंटर,
घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड,
इंडियन ऑईल कॉलनी समोर,
गोवंडी, मुंबई - ४०००४३.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. १२.११.२०१८ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. १२.११.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | मुंबई उपनगरात वीज पुरवठा करणाऱ्या कंपन्यापैकी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी वीज बिल दरात सन २०१७ व सन २०१८ साली कोणत्या महिन्यात वाढ केली व त्याचे टॅरिफ कार्ड काय होते याची माहिती मिळणेबाबत. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने याचिका क्र. ३४/२०१६ मध्ये मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर यांचे वीज दर निश्चितीस दि. २१/१०/२०१६ रोजी मंजुरी दिलेली होती. तद्नंतर मध्यावधी वीज आढाव्यातील याचिका क्र. २००/२०१७ दि. १२/९/२०१८ च्या आदेशाद्वारे सुधारीत वीज आकार दि. १ सप्टेंबर, २०१८ पासून लागू झालेले आहेत.<br><br>या दोन्ही वीज दर निश्चितीकरणाचे आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या www.mercindia.org.in आणि mercindia.gov.in या संकेतस्थळावर मोफत उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहेत. |
| २ | अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड ने सन २०१८ साली कोणत्या महिन्यात वाढ केली त्याचे टॅरिफ कार्ड मिळणेबाबत. | |
| ३ | वाढ केली असल्यास आपल्या आयोगाकडून त्यांनी परवानगी घेतली का? याची माहिती व प्रत मिळणेबाबत. | |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| ४ | वीज बिलात वाढ करण्याबाबतची जनसुनावणी केव्हां घेण्यात आली याची माहिती व प्रत मिळणेबाबत. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दाखल झालेल्या मध्यावधी वीज दर आढावा याचिका क्र.२००/२०१७ बाबतची जाहीर सुनावणी दि.२/०८/२०१८ रोजी जागतिक व्यापार केंद्र क्र. १, पहिला मजला, सेंट्रम हॉल येथे घेण्यात आलेली आहे. याबाबतचा तपशील वीज दर निश्चितीकरणाच्या आदेशामध्ये नमूद करण्यात आला आहे. |
| ५ | अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड ने वीज बिलात वाढ करण्याची जाहिरात वर्तमानपत्रात व ग्राहकांना वीज बिला सोबत कधी दिली याची माहिती मिळणेबाबत. | याबाबतची माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही. |

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी